# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–०४

## ।। प्रकटन ।।

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम – २०१५ अंतर्गत मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या ऑनलाईन सेवांबाबत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम – २०१५ अंतर्गत विद्यार्थी / नागरिकांसाठी एकूण ०५ सेवा ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

सदर ०५ अधिसूचित सेवांच्या नावाचा व सेवांना लागणारा कालावधी तसेच त्यासंबंधित पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांचा तपशील खालील तक्त्यात देण्यात येत आहेत.

| अ. क्र. | अधिसूचित सेवेचे नाव | अधिसूचित सेवेचा विहित कालावधी | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा द्वितीय गुणपत्रक व प्रमाणपत्रे | तात्काळ साठी ३ दिवस व नियमित साठी ७ दिवस | | | |
| २ | माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा तात्पुरते (Provisional) प्रमाणपत्र | निकालानंतर अर्ज सादर केल्यापासून ८ दिवस | | | |
| ३ | माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा गुणपडताळणी | निकालानंतर अर्ज सादर केल्यापासून १५ दिवस | संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय सचिव | संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय अध्यक्ष | अध्यक्ष, राज्यमंडळ |
| ४ | माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा निकालानंतर उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत प्राप्त करणे | निकालानंतर अर्ज सादर केल्यापासून ३० दिवस किंवा तत्पूर्वी | | | |
| ५ | खाजगी उमेदवार परीक्षेस प्रविष्ट होणे | मंडळाच्या वार्षिक वेळापत्रकाप्रमाणे | | | |

अधिक माहितीकरिता राज्य मंडळाच्या www.mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर भेट देवून मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या ऑनलाईन सेवांचा लाभ घ्यावा, याची सर्व विद्यार्थी/पालक/नागरिकांनी नोंद घ्यावी.

( प्रमोद गोफणे )
सहसचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

दिनांक – ३०/०९/२०२५

क्रमांक/पुविमं/आस्थापना/ 8277
पुणे ४११००५
दिनांक – ०९/१०/२०२५
14

प्रति,

सर्व शाळा /कनिष्ठ महाविद्यालय /विद्यार्थी,
पालक व सर्व संबंधित घटक
जिल्हा - पुणे, अहिल्यानगर, सोलापूर

विषय : – महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या ऑनलाईन सेवांबाबत

संदर्भ :- राज्यमंडळ कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./आस्था -७ /३३६१ दि .३०/०९/२०२५

उपरोक्त राज्यमंडळाच्या पत्राच्या अनुषंगाने सर्व शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय/ विद्यार्थी/ पालक व सर्व संबंधित घटकांना कळविण्यात येते की, संदर्भीय पत्रामध्ये राज्यमंडळ, पुणे यांनी सूचित केल्यानुसार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत एकूण ०५ सेवा ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. तसेच अधिक माहितीकरिता राज्यमंडळाच्या www.mahahsscboard.In या अधिकृत संकेतस्थळावर भेट देवून मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या ऑनलाईन सेवांचा लाभ घ्यावा. याबाबत सर्वांनी नोंद घ्यावी.

Digitally signed by
Kailas Ganpatrao Datkhil
Date: 12-10-2025
20:18:35

विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११००५

DEKSTOP/JAGADE 1/SADAR